*१९९६ पूर्वीच्या आणि नंतरच्या निवृत्तिवेतनधारकांच्या/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात /कुटुंब निवृत्तिवेतनात सुधारणा — थकबाकीचा तिसरा हप्ता प्रदान करणेबाबत..*

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन निर्णय, क्रमांक: सेनिवे-१००१/२७४ /सेवा-४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १ ऑक्टोबर २००१.

**पहा** :- (१) शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक-सेनिवे १०९९/३०२/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९.
(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे १०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९.
(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे १००१/३८/सेवा-४, दिनांक १६ जानेवारी २००१.

## *निर्णय*

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुओ-मोटू रिट पिटीशन क्रमांक २४३२/१९९९ व रिट पिटीशन क्रमांक-१७४७/१९९९ या प्रकरणी दिनांक २४ ऑगस्ट १९९९ रोजी दिलेल्या निवाडयाच्या परिणामी शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे १०९९/३०२/सेवा-४, दिनांक १५नोव्हेंबर १९९९ आणि शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे १०९९/३०३/सेवा-४ दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ अन्वये असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत की १९९६ नंतरच्या निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्याबाबतीत सुधारित निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन, निवृत्तिवेतनावरील महागाई वाढ, उपदान, निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण यांची थकबाकी आणि १९९६ पूर्वीच्या निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्याबाबतीत एकत्रित निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतनाची **१ जानेवारी १९९६ ते ३० जून १९९९** पर्यन्तच्या कालावधीची थकबाकी तीन समान वार्षिक हप्त्यात प्रदान करण्यात यावी व त्यापैकी पहिला हप्ता ३१ मार्च २००० पूर्वी देण्यात यावा आणि पुढील दोन हप्ते नंतरच्या दोन आर्थिक वर्षात देण्यात यावेत. त्यानुसार थकबाकीचा पहिला हप्ता व दुसरा हप्ता प्रदान करण्याबाबतचे आदेश वर (१), (२) व (३) येथे निर्देशिलेल्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

२. **आता असा निर्णय घेण्यात आला आहे की, थकबाकीचा तिसरा हप्ता चालू आर्थिक वर्षात म्हणजे ३१ मार्च, २००२ पूर्वी देण्यात यावा.** तिसऱ्या हप्त्याच्या मागण्यांचे आहरण व संवितरण करताना वरील (१) येथील शासन निर्णयातील **परिच्छेद-१३** मध्ये नमूद करण्यात आलेल्या खालील अटी शिथिल करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे:-

(अ)वेतन पडताळणी पथकाकडून महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ नुसार वेतन पडताळणी केली जाणे;

(ब)वेतन पडताळणी पथकाकडून करण्यात आलेल्या वेतन पडताळणीसंबंधी आवश्यक त्या नोंदी घेऊन, सेवा पुस्तकासह निवृत्तिवेतनविषयक कागदपत्रे यथास्थिती, महालेखापाल, मुंबई/नागपूर यांचेकडे ३० सप्टेंबर २००० पूर्वी पाठविणे, आणि

(क)सुधारित निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन, उपदान आणि निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य यांची प्राधिकारपत्रे यथास्थिती, महालेखापाल, मुंबई/नागपूर यांचेकडून ३१ मार्च २००१ पूर्वी निर्गमित केली जाणे.

तथापि, उपरोल्लेखित शासन निर्णयामध्ये विहित करण्यांत आलेली उर्वरित कार्यपध्दती यापुढेही लागू राहील व तिचे पालन करणे आवश्यक राहील.

३. **<u>ज्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या प्रकरणी या आदेशानुसार थकबाकीच्या तिसऱ्या हप्त्याचे प्रदान केल्यानंतर सुधारित निवृत्तीवेतनविषयक लाभ, संबंधित महालेखापालांकडून अंतिमतः प्राधिकृत करण्यात येतील अशा प्रकरणी अनुसरावयाची कार्यपध्दती -</u>**

***(i)* <u>उपदानाच्या बाबतीत</u>**

संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखाने, तीन हप्त्यांद्वारे प्रदान करण्यांत आलेली उपदानाची एकूण रक्कम व महालेखापाल कार्यालयाने अंतिमतः प्राधिकृत केलेली उपदानाची रक्कम यांमध्ये तफावत आहे किंवा कसे याबाबत खालीलप्रमाणे तपासणी करावी,

***(अ)*** महालेखापालांनी अंतिमतः प्राधिकृत केलेल्या रकमेपेक्षा निवृत्तीवेतनधारकास कार्यालय/विभाग प्रमुख यांचेकडून प्रदान करण्यांत आलेली उपदानाच्या तीन हप्त्यांची एकूण रक्कम कमी असेल तर अशा उर्वरित फरकाच्या रकमेचे प्रदान करण्यासाठी संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखाने विहित नमुन्यातील देयक, विभाग/कार्यालय प्रमुखाची नियमित देयके ज्या कोषागारातून आहरीत केली जातात त्या कोषागारास सादर करावे.

***(ब)*** महालेखापालांनी अंतिमतः प्राधिकृत केलेल्या उपदानाच्या रकमेपेक्षा विभाग/कार्यालय प्रमुखातर्फे निवृत्तीवेतनधारकास तीन हप्त्यात प्रदान करण्यांत आलेली उपदानाची रक्कम जास्त असेल म्हणजेच अतिप्रदान झालेले असेल तर अशा रकमेची वसूली करण्याच्यादृष्टीने विभाग/ कार्यालय प्रमुखाने निवृत्तिवेतनधारक / कुटुंबनिवृत्तीवेतनधारक ज्या कोषागारातून नियमित निवृत्तिवेतन घेत असेल त्या कोषागार अधिकाऱ्यास आवश्यक ती वसूली मासिक निवृत्तिवेतनातून करण्याबाबत लेखी कळवावे व सदर वसूली योग्यरित्या केली जात आहे याबाबत वेळोवेळी खातरजमा करावी.

***(ii)* <u>निवृत्तिवेतन व निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण यांचे बाबतीत</u>**

निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे, यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांनी निवृत्तिवेतन तसेच निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची तीन हप्त्यांद्वारे संबंधित निवृत्तीवेतनधारकांस प्रदान करण्यांत आलेली एकूण रक्कम व महालेखापाल कार्यालयाने अंतिमतः प्राधिकृत

केलेली निवृत्तिवेतन तसेच निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम यामध्ये तफावत आहे किंवा कसे याबाबत खालीलप्रमाणे तपासणी करावी,

*(अ)* महालेखापालांनी अंतिमतः प्राधिकृत केलेल्या निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या तसेच निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या रकमेपेक्षा निवृत्तीवेतनधारकास तीन हप्त्यात प्रदान करण्यात आलेली निवृत्तिवेतनाची थकबाकी तसेच निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम जर कमी असेल तर अशा उर्वरित फरकाच्या रकमेचे प्रदान संबंधित निवृत्तीवेतनधारकास, निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे, यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांनी करावे.

*(ब)* महालेखापालांनी अंतिमतः प्राधिकृत केलेल्या रकमेपेक्षा निवृत्तीवेतनधारकास प्रदान करण्यात आलेली निवृत्तिवेतनाची थकबाकी तसेच निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम जर जास्त असेल म्हणजेच अतिप्रदान झालेले असेल तर अशी अतिप्रदान झालेली निवृत्तिवेतनाच्या थकबाकीची तसेच अंशराशीकरणाची रक्कम, निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे, यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांनी निश्चित करावी व सदरहू रकमेची वसूली त्यांच्या मासिक निवृत्तीवेतनातून करण्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

*(क)* वरील दोन्ही प्रकरणी संबंधित निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे, यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांनी संबंधित निवृत्तिवेतनधारकांचे मासिक निवृत्तिवेतन महालेखापालांनी अंतिमतः प्राधिकृत केलेल्या दरानुसार सुधारित करावे.

*(ड)* वरील कार्यवाही निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे, यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांचेकडून करावयाची असल्याने विभाग/कार्यालय प्रमुखांने याबाबत कोणतेही देयक कोषागारात सादर करु नये.

४. **ज्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या प्रकरणी या आदेशानुसार तिस-या हप्त्याचे प्रदान करण्यापूर्वी सुधारित निवृत्तीवेतनविषयक लाभ, महालेखापालांकडून अंतिमतः प्राधिकृत करण्यात आले आहेत अशा प्रकरणी अनुसरावयाची कार्यपध्दती -**

*(अ)* **१९९६ नंतरच्या निवृत्तिवेतनधारकांच्या,** ज्या प्रकरणी सुधारित निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन, निवृत्तिवेतनावरील महागाई वाढ, उपदान, निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण यांच्या रकमा वर (१) येथे निर्देशिलेल्या शासन निर्णयातील परिच्छेद-१३ मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार **तिसऱ्या हप्त्याच्या प्रदानापूर्वी प्राधिकृत** करण्यात आलेल्या असतील अशा प्रकरणी त्यानुसार थकबाकीच्या तिस-या हप्त्याचे प्रदान **संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखांकडून करण्यांत यावे.**

*(ब)* **१९९६ पूर्वीच्या निवृत्तिवेतनधारकांच्या,** ज्या प्रकरणी वर (२) येथे निर्देशिलेल्या शासन निर्णयातील परिच्छेद ४, ५ व ७ नुसार निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतनाचे **तिसऱ्या हप्त्याच्या प्रदानापूर्वी अंतिमतः एकत्रिकरण** करण्यात आलेले असेल, अशा प्रकरणी त्यानुसार थकबाकीच्या

तिसऱ्या हप्त्याचे प्रदान **निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजेच, यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांचेकडून करण्यांत यावे.**

५. वरील सूचनांव्यतिरिक्त तिसऱ्या हप्त्याचे प्रत्यक्षात प्रदान कोणत्या पध्दतीने करावे याबाबत सविस्तर सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

६. अजूनही अशी प्रकरणे असतील की जेथे, विविध कारणास्तव, थकबाकीच्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचे आहरण व संवितरण केले गेलेले नाही. आता असे निदेश देण्यात येत आहेत की, अशा सर्व प्रकरणी पहिल्या व दुसऱ्या हप्त्याच्या देय रकमेसह तिसऱ्या हप्त्याचे प्रदान करण्यात यावे.

७. **थकबाकीचा पहिला हप्ता / दुसरा हप्ता, असल्यास, आणि तिसरा हप्ता निवृत्तिवेतनधारकांना कोणत्याही परिस्थितीत ३१ मार्च २००२ पूर्वी प्रदान केला जाईल, याची सर्व संबंधित प्राधिका-यांनी खात्री करुन घ्यावी.**

८. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील निवृत्तिवेतनधारक /कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना उपरोल्लेखित निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू राहतील.

९. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार याचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहतील.

१०. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदात नमूद केलेल्या निवृत्तिवेतनधारकांची /कुटुंब निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतने/कुटुंब निवृत्तिवेतने ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तथापि, आवश्यक असल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील निवृत्तिवेतनधारकांसंबंधीचा खर्च भागविण्यासाठी विधीमंडळाच्या आगामी अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

११. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वसन्त वा. चौधरी,**
शासनाचे उप सचिव.

पच-663(3,000150-10-01)23

प्रति,

भारत सरकारचे सचिव,वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (२५ प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग,मंत्रालय, मुंबई (५०० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

*पत्राद्वारे.

***Revision of Pension / Family Pension of pre and post-1996 Pensioners / Family pensioners – Payment of third instalment of arrears***

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## Finance Department

No. PEN-1001/274/SER-4,

Mantralaya, Mumbai-400 032. dated 1 October 2001

***Read :-*** *(1) Government Resolution, Finance Department, No.PEN 1099/302/SER-4, dated 15 November 1999*

*(2) Government Resolution, Finance Department, No.PEN 1099/303/SER-4, dated 15 November 1999*

*(3) Government Resolution, Finance Department, No.PEN 1001/38/SER-4, dated 16 January 2001*

## ***RESOLUTION***

As a sequel to the judgement dated 24 August 1999 of the Hon. High Court, Mumbai, in suo-moto Writ Petition No.2432/99 and Writ Petition No. 1747/1999, orders have been issued under Government Resolution, Finance Department, No.PEN 1099/302/SER-4, dated 15 November 1999 and Government Resolution, Finance Department, No.PEN 1099/303/SER-4, dated 15 November 1999 to the effect that in respect of post-1996 pensioners, arrears on account of revised pension / family pension, dearness relief on pension, gratuity, commutation of pension and in respect of pre-1996 pensioners arrears on account of consolidation of pension / family pension, for the period from **1 January 1996 to 30 June 1999,** should be paid in three equal annual instalments, out of which first instalment should be paid before 31 March 2000 and the next two instalments in the two financial years to follow. Accordingly, orders to pay first and second instalments of arrears have already been issued vide Government Resolutions referred to at (1), (2)and (3) above.

2. **It has now been decided that the third instalment of arrears should be paid during the current financial year i.e. before 31 March 2002.** It has also been decided to relax the following conditions laid down in **paragraph 13** of Government Resolution referred to at (1) above in drawing and disbursing the claims for the third instalment :-

***a)*** the requirement of verification of pay under the Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules 1998, by the Pay Verification Unit;

***b)*** the submission of pension papers to the Accountant General, Mumbai/Nagpur, as the case may be, along with Service Book after taking necessary entries regarding verification of pay by the Pay verification Unit before 30 September 2000; and

c) the authorisation of revised pension / family pension, gratuity and commuted value of pension by the Accountant General, Mumbai/Nagpur, as the case may be, before 31 March 2001.

However, the rest of the procedure prescribed in the aoresaid Government Resolution shall continue to apply and have to be observed.

3. **<u>The procedure to be followed in respect of the cases of pensioners/family pensioners where the revised pensionary benefits have been finally authorised by the Accountant General concerned, after the payment of third instalment of arrears as per these orders-</u>**

(i) **<u>In respect of gratuity</u>**

The Head of Department/Office concerned, should examine whether there is any difference between the total amount of gratuity paid to the pensioner by Head of Department/Office in three instalments and the amount of gratuity finally authorised by the Accountant General concerned in the following manner-

***(a)*** If the total amount of gratuity paid to the pensioner by Head of Department/Office in three instalments is ***<u>less</u>*** than the amount of gratuity finally authorised by the Accountant General, the Head of Department/Office should forward a bill in the prescribed form to the treasury from where the Head of Department/Office draws his regular bills, for the payment of such difference.

***(b)*** If the total amount of gratuity paid to the pensioner by Head of Department/Office in three instalments is ***<u>more</u>*** than the amount of gratuity finally authorised by the Accountant General, i.e. if overpayment is made, the Head of Department/Office should give instructions in writing to the treasury officer from where the said pensioner is drawing his regular pension, to recover the over payment made from his monthly pension and should ensure from time to time that the recovery is made properly.

(ii) **<u>In respect of pension and commutation of pension</u>**

The Pension Disbursing Authority i.e. Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officer, as the case may be, should examine whether there is any difference between the amount of arrears of pension as well as commutation of pension, already paid to the pensioner in three instalments and the amount of arrears pf pension as well as commutation of pension finally authorised by the Accountant General, in the following manner-

*(a)* If the amount of arrears of pension as well as commutation of pension which is already paid to the pensioner in three instalments is less than the amount of arrears of pension as well as commutation of pension finally authorised by the Accountant General, the Pension Disbursing Authority i.e. Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officer, as the case may be, should pay the amount of such difference to the pensioner concerned.

*(b)* If the amount of arrears of pension as well as commutation of pension which is already paid to the pensioner in three instalments is more than the amount of arrears of pension as well as commutation of pension finally authorised by the Accountant General, i.e. if overpayment is made, the Pension Disbursing Authority i.e. Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officer, as the case may be, should work out the amount of overpayment made to the pensioner and should take necessary action for recovery of the same from his monthly pension.

*(c)* In both the cases mentioned above, Pension Disbursing Authority i.e. Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officer, as the case may be, should revise the monthly pension of the pensioner concerned, as per the rate of monthly pension finally authorised by the Accountant General.

*(d)* As the action as proposed above is to be taken by the Pension Disbursing Authority i.e. Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officer, as the case may be, Head of Department/Office should not forward any bill to treasury office.

4. **The procedure to be followed in respect of the cases of pensioners/family pensioners where the revised pensionary benefits have been finally authorised by the Accountant General concerned, before the payment of third instalment of arrears as per these orders.**

(a) In cases of **post - 1996 pensioners,** where pension / family pension / gratuity / commutation of pension have been finally authorised in accordance with the procedure laid down in paragraph 13 of the Government Resolution referred to at (1) above **before the payment of third instalment,** in such cases third instalment of the arrears should be paid accordingly **by the Head of Department/Office concerned.**

(b) In cases of **pre-1996 pensioners,** where consolidation of pension / family pension has been done in accordance with the provisions of paragraphs 4,5 and 7 of the Government Resolution referred to at (2) above **before the payment of third instalment,** in such cases third instalment of the arrears should be paid accordingly, **by the Pension Disbursing Authority i.e. Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officer, as the case may be.**

5. Apart from above instructions, detailed instructions are being separately issued in respect of procedure to be followed for actual payment of third instalment as above.

6. There may still be instances where, for various reasons, the first & second instalments of arrears have not been drawn and disbursed . It is now directed that in all such cases the amount of the first & second instalment due and admissible should also be released along with the amount of the third instalment of arrears.

7. **All the authorities concerned should ensure that the first instalment/ second instalment, if any, and third instalment of arrears are paid to the pensioners, under any circumstances, before 31 March 2002.**

8. Government is also pleased to direct that the abovementioned decisions should *mutatis mutandis* apply to the employees of Recognised and Aided Educational Institutions, Non-Agricultural Universities and Affiliated Non-Government Colleges and Agriculture Universities to whom the pension scheme is made applicable.

9. In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, the Government is further pleased to decide that the abovementioned decisions apply to the employees of Zilla Parishads.

10. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the foregoing paragraphs are debited and should be met from the grants sanctioned thereunder. However, if necessary, Administrative Departments concerned of the Mantralaya should take steps to present Supplementary Demands in the ensuing session of the Legislature to meet the additional expenditure, to be incurred in respect of aforesaid pensioners.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**VASANT W. CHAUDHARI ,**
**DEPUTY SECRETARY TO GOVERNMENT.**

* * * * *